जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 FEB 2018
Times of India

# Consumer studies likely to be on varsity syllabus

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The University Grants Commission (UGC) has asked varsities across the country to include modules on consumer studies in their syllabus. It has also prepared a model syllabus for the same.

The circular dated February 9 stated that the department of consumer affairs has been taking steps to promote and protect consumer rights, as provided under the Consumer Protection Act, 1986. The idea is to strengthen the consumer movement in India by creating awareness among all segments of consumers, including college students.

Greater involvement of students in the consumer movement will enhance the pace at which the ideals of the movement percolate. Understandably, one of the ways in which this objective can be realised is through inclusion of modules on consumer studies as an elective course in the universities/colleges syllabi, it said.

The circular from UGC secretary P K Thakur further said that the course module for consumer affairs as an elective at the under-graduate level has been prepared by the expert committee. The details of this model syllabus have been uploaded on www.ugc.ac.in.

Since every student is a consumer and will continue to be so for the rest of his/her life, this module may be offered as an elective for students of any discipline, it said.

The circular further stated the course may be requested, pursued and suitably adopted by the universities and the affiliated colleges.

Considering the importance and relevance of the module and complexity in terms of topics, it is requested of universities to conduct development programmes for the faculty members teaching this module.

The UGC has given suggested readings, reference articles, periodicals for more information on the course on its website.

15 FEB 2018
लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**सयाजीरावांच्या भाषणाने मराठी साहित्याला दिशा : करवीर नगर वाचन मंदिरच्यावतीने डिसेंबर १९३२ मध्ये झाले संमेलन**

# कोल्हापूर-बडोदा संस्थानचे ८६ वर्षांचे साहित्यिक ऋणानुबंध

समीर देशपांडे ।
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** बडोदा येथे होणाऱ्या ९१ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर कोल्हापूर आणि बडोदा संस्थानच्या साहित्यिक ऋणानुबंधांना उजाळा मिळाला आहे. सन १९३२ मध्ये कोल्हापूर येथे छत्रपती राजाराम महाराजांच्या नेतृत्वाखाली झालेल्या १८ व्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी बडोद्याचे संस्थानिक सयाजीराव गायकवाड यांची निवड झाली होती. प्रकृती अस्वास्थ्यामुळे ते स्वत: येऊ शकले नव्हते. मात्र, त्यांच्या भाषणातून त्यांनी जी मांडणी केली, ती मराठी साहित्याला दिशादर्शक ठरली होती.



राजाराम महाराज



सयाजीराव गायकवाड

कोल्हापुरातील करवीर नगर वाचन मंदिरच्यावतीने दि. २७ ते २९ डिसेंबर १९३२ मध्ये हे संमेलन घेण्यात आले होते. सध्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयाचे त्यावेळी 'लॉर्ड आर्यर्विन म्युझियम' असे नाव होते. स्वातंत्र्यानंतर स्वातंत्र्यसैनिक गोटखिंडीकर यांनी प्रशासनाशी संघर्ष करून या इमारतीला 'स्वराज्य भवन 'असे नाव देण्यास भाग पाडले होते. या इमारतीसमोर मोठा मंडप घालण्यात आला होता.

प्रत्यक्षात संमेलनाचे अध्यक्ष सयाजीराव गायकवाड हे येऊ शकले नाहीत. मात्र, त्यांनी आपले प्रतिनिधी म्हणून बडोद्याचे दिवाण आर. एस. माने-पाटील यांना पाठविले होते. गायकवाड यांच्या भाषणामध्ये वाङ्मय म्हणजे काय हे सांगून बडोदा संस्थानात ग्रंथप्रसारासाठी सुरु असलेल्या प्रयत्नांची माहिती दिली होती. संत ज्ञानेश्वरांपासून ते संत मेळ्यातील संतांच्या कामगिरीबाबत त्यांनी भाष्य केले होते.

भाषणात गायकवाड म्हणाले होते, आपल्या वाङ्मयात विशेष कमतरता अशी दिसते की ते विशिष्ट वर्गाने, विशिष्ट वर्गासाठी लिहिलेले आहे असे वाटते. जुन्या ग्रंथास सर्व जातींच्या लेखकांचा हात लागलेला आहे; पण गेल्या पन्नास वर्षांतल्या कादंबऱ्यांची, नाटकांची किंवा गोष्टींची पात्रे पांढरपेशी वर्गातली व मुंबई-पुण्याकडील दिसतात.

स्थानिक वैशिष्ट्य त्यात नसते व भाषा फार बोजड असते. विशिष्ट वर्गाकडूनच लिहिले गेल्यामुळे मराठी पुस्तके एकांगी झाली आहेत.

## महात्मा फुलेंचा उल्लेख

याच भाषणात गायकवाड यांनी महात्मा फुले यांच्या निबंधांचा उल्लेख समतावादी निबंध म्हणून केला होता. त्यावेळी महात्मा फुले यांचे काम सर्वपरिचित झाले नसताना सयाजीराव गायकवाड यांनी कोल्हापुरातील साहित्य संमेलनामध्ये हा उल्लेख करणे महत्त्वाचे मानले जाते.

## संमेलन मंडपाबाहेर हत्ती आणि चित्ते

राजाराम महाराजांच्या नेतृत्वाखाली हे संमेलन होत असताना त्याचा थाटही शाही होता. मंडपाबाहेर चार सजवलेले हत्ती झुलत होते, तर चार गाड्यांवर चार चित्तेही ठेवले होते. हे पाहून राज्यभरातून आलेले साहित्यिक आणि रसिकही विस्फारुन हे चित्र पाहत असल्याचे वर्णन पाहावयास मिळते.

## दर्यावर्दीपणाबद्दल एकही पुस्तक नाही

महाराष्ट्राला ३०० मैलांचा समुद्रकिनारा लाभला आहे. मात्र, मच्छिमारांबाबत किंवा दर्यावर्दीपणाबद्दल एकही पुस्तक मराठीमध्ये का नाही, अशी विचारणा त्यांनी या भाषणातून केली होती.

> सयाजीराव मराठी साहित्यासंबंधी किती पुढचे पाहत होते; त्याचे प्रत्यंतर या भाषणात आहे. अनेक नव्या गोष्टींचा उच्चार या भाषणात आहे. मराठी साहित्याला विशालता व व्यापकत्व येण्यासाठी कोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे याचा विचार सयाजीराव गायकवाड यांनी आपल्या भाषणातून मांडला.
>
> \- प्रा. रणधीर शिंदे, मराठी विभागप्रमुख, शिवाजी विद्यापीठ

जनसंपर्क कक्ष
5 FEB 2018 महाराष्ट्र टाईम्स शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




शिवाजी विद्यापीठ व रोटरी क्लब करवीर आयोजित 'मून २०१८' या कार्यक्रमात सहभागी झालेले विविध देशांचे प्रतिनिधी व विद्यार्थी

# व्यक्तिमत्त्व बदलासाठी 'मून' हवेच

**कोल्हापूर टाइम्स टीम**

'देशाच्या विकासात योगदान द्यायचे असेल तर वैयक्तिक विचारसरणी, जडणघडणीबरोबर आंतरराष्ट्रीय विचार आत्मसात करणे गरजेचे आहे. मून २०१८ हा भविष्यात विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वात बदल घडविण्यात महत्वपूर्ण ठरणार आहे' असे प्रतिपादन रोटरीचे डिस्ट्रीक्ट गव्हर्नर आनंद कुलकर्णी यांनी केले. रोटरी क्लब ऑफ करवीर व शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र विभाग यांचे संयुक्त विद्यमाने भरविणेत आलेल्या 'मून २०१८' कार्यक्रमाच्या समारोपात ते बोलत होते. या उपक्रमात संयुक्त राष्ट्र संघाचे प्रतिनिधी सहभागी झाले होते.

यावेळी 'मून'चे सेक्रेटरी नासीर बोरसदवाला उपस्थित होते. कार्यक्रमात अंमली पदार्थ सेवन, त्याचा व्यवसाय आणि मानवी तस्करीचा व्यापार व आण्विक शस्त्रे युद्धात वापरण्यास आंतरराष्ट्रीय बंदी आणणे हे प्रस्ताव मंजूर करण्यात आले. 'मिस्टर मून' विश्वजित पाटील, 'मिस मून' मोनाली देसाई, 'फर्स्ट बेस्ट टीम' ऐश्वर्या नरके व निकिता पिसे, 'सेकंड बेस्ट टीम' नोमान सय्यद व वैष्णवी कुलकर्णी, 'बेस्ट वेशभूषा पुरुष' फैजल शेख, 'बेस्ट वेशभूषा' महिला हेमल इंगळे तसेच 'बेस्ट परफॉर्मन्स ईन ब्लॉक मिटिंग'मध्ये पॅट्रीक पास्कल, ॲलॉय इलेयाज (बुरुंडी), कौशल लधड, श्रुती हंगीरेकर, गॉडविन सेगेरो, लुसि ओकेयो(केनया), कार्मेलीना लिझा फर्नांडीस, वैशाली हन्नुरकर, आफताब शेख, नितीन चीक्के, बेस्ट परफॉर्मन्स सांस्कृतिक कार्यक्रम पुरुष व महिला यांच्यात श्रेयस मोहिते, कार्मेलीना लिझा फर्नांडीस यांना सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमास 'वायसीआरडी'चे डॉ. अनिल माळी, 'रोटरी'चे संग्राम पाटील, विशाल जांभळे, प्रमोद चौगुले, दिलीप शेवाळे, निशिकांत नलवडे, मनोज कोळेकर, दिलीप प्रधाने, ऋषिकेश केसरकर, प्रदीप गांधी, वारणा वडगावकर, दिलीप शेवाळे उपस्थित होते. पर्यवेक्षक म्हणून डॉ. विशाखा आपटे, डॉ. विवेक धुपदाळे, नेहा वाडकर यांनी काम पहिले. कार्यक्रमाच्या संयोजनात शीतल दुग्गे, स्वप्नील कांबळे, अंकुश कराडे आदींनी सहभाग घेतला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 FEB 2018
पुढारी

# विज्ञान कथालेखन कार्यशाळेचे आयोजन

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठ, मराठी विभाग आणि मराठी विज्ञान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने विज्ञान कथा लेखन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. शिवाजी विद्यापीठ येथे दि. ६ मार्च रोजी तीनदिवसीय कार्यशाळा संपन्न होणार आहे. कार्यशाळेचे उद्घाटन सकाळी साडेदहा वाजता वडोदराच्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांच्या हस्ते होणार आहे. याप्रसंगी विज्ञान कथा जगतातले मान्यवर कथा, लेखक-लेखिका मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेत सहभाग घेण्याकरिता नावनोंदणी आवश्यक असून रविवार दि. २५ अखेर नावनोंदणी करणे क्रमप्राप्त आहे. मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ येथे संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले. कार्यशाळेस प्रवेश विनामूल्य आहे, अशी माहिती प्रसिद्धी पत्रकाद्वारे देण्यात आली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 FEB 2018
सकाळ

# विज्ञान कथा लेखन कार्यशाळा ६ पासून

कोल्हापूर, ता. १४ : शिवाजी विद्यापीठ मराठी विभाग, मराठी विज्ञान परिषद यांच्यातर्फे ६, ७ आणि ८ मार्चला विद्यापीठात विज्ञान कथा लेखन कसे करावे यावर कार्यशाळा होणार आहे. बडोद्याच्या साहित्य साहित्य संमेलनाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांच्या हस्ते उद्घाटन होईल. डॉ. बाळ फोंडके (मुंबई), प्रा. यशवंत देशपांडे (औरंगाबाद), प्रा. माधुरी शानबाग (बेळगाव), प्रा. मोना चिमोटे (अमरावती), प्रा. संजय ढोले (पुणे) प्रा. शिरीष गोपाळ देशपांडे (मुंबई) हे मार्गदर्शन करणार आहेत. इच्छुकांनी नाव, पत्ता, व्यवसाय या माहितीसह मराठी विभागप्रमुख, शिवाजी विद्यापीठ येथे २५ फेब्रुवारीपर्यंत अर्ज करावा, अशी माहिती मराठी विज्ञान परिषद, कोल्हापूर विभागाचे अध्यक्ष शिवाजीराव पवार यांनी कळवली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 FEB 2018
महाराष्ट्र टाईम्स

# 'एमबीए'च्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील एमबीए विभागातील माजी विद्यार्थ्यांचा मेळावा झाला. माजी विद्यार्थ्यांनी एमबीए भाग एक व दोनच्या विद्यार्थ्यांना नोकरी, उद्योजकतेच्या उपलब्ध संधी, व्यक्तिमत्व विकासासह कौशल्य विकासाबाबत मार्गदर्शन केले. माजी विद्यार्थ्यांनी आपले अनुभव, विविध संधींविषयी मार्गदर्शन केले. माजी विद्यार्थ्यांनी प्लेसमेंट आणि कौशल्य विकासासाठी मदत करण्याचे आश्वासन दिले. अध्यक्षस्थानी विभागाचे संचालक डॉ. एच. एम. ठकार होते. डॉ. दीपा इंगवले यांनी प्रास्ताविक केले. गंधाली खारगे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 FEB 2018
तरुण भारत

# अखिल भारतीय विद्यापीठ पॉवरलिफ्टिंगमध्ये प्रियदर्शनी पहिली

**कोल्हापूर :** पंजाब विद्यापीठात (चंदीगड) झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ



पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत तारदाळ (ता. हातगणंगले) येथील प्रिर्यदर्शनी जागृष्टे हिने ८४ किलो वजन गटात पहिला क्रमांक पटकावला. तिने स्पर्धेच्या स्कॉट प्रकारात २२५ किलो, बेंचप्रेस प्रकारात ९५ किलो आणि डेडलिष्ट प्रकारात २०० किलो असे ५२० किलो वजन उचलले. ती क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर शारीरिक महाविद्यालयाची विद्यार्थिनी आहे. तिला प्रभारी प्राचार्य ए. बी. शिंदे, प्रा. संजय बागुल, प्रा. शंकर गोनुगडे आदींचे मार्गदर्शन लाभले आहे.



साहित्य भान

प्रा. रणधीर शिंदे

# कोल्हापूरची संमेलने

बडोदा नगरीत १६ फ्रेबुवारीला ९१ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन संपन्न होत आहे. बडोदा नगरीत १९०९ साली झालेले संमेलन हे महाराष्ट्राबाहेरील पहिलेच संमेलन होते. त्यानंतर १९२१ साली व १९३४ साली साहित्य संमेलने बडोद्यास झाली. कर्नल कान्होबा कीर्तीकर, न. चिं. केळकर व ना. गो. चाफेकर या संमेलनांचे अध्यक्ष होते. बडोदा संस्थान व कोल्हापूर संस्थानचा तसा फार जवळचा ऋणानुबंध. सयाजीराव महाराज, छत्रपती शाहू महाराज या समकालीन राजांमध्ये राजकारण, प्रागतिकता सुधारणे संदर्भात बरेच साम्य होते. सयाजीरावांनी कोल्हापूरच्या अध्यक्षीय भाषणात छत्रपती घराण्याच्या निकट स्नेहाचा उल्लेख केला होता. कोल्हापुरात २७ डिसेंबर ते २९ डिसेंबर १९३२ या कालावधीत सातवे महाराष्ट्र साहित्य संमेलन झाले. आयर्विन म्युझियमच्या प्रांगणातील (सध्याचे जिल्हाधिकारी कार्यालय) सभामंडपात दहा हजारांहून अधिक लोक या संमेलनास उपस्थित होते. सभामंडपाबाहेर अलंकारमंडित हत्ती व गाड्यांवर पाच चित्ते ठेवले होते. उद्घाटक छत्रपती राजाराम महाराज होते. या साहित्य संमेलनावर संस्थांनी वैभवाची छाया होती. संमेलनाध्यक्ष सयाजीराव गायकवाड प्रकृती अस्वास्थ्यामुळे हजर राहू शकले नव्हते. त्यांच्यावतीने प्रतिनिधी म्हणून हुजूर चिटणीस रावबहादूर आर. एस. माने-पाटील हे उपस्थित होते. त्यांनी महाराजांचे विचारप्रवर्तक भाषण वाचून दाखविले. आरंभीच त्यांनी शारदादेवीच्या फिरत्या यात्रेला हिंदुस्थानच्या सर्व भागांतून तिचे भक्त पंढरीच्या वारकऱ्यांप्रमाणे येतात असे म्हटले. मराठीचे मूळ प्राकृत असल्याचे सांगून त्यांनी वाङ्मयीन परंपरा, ग्रंथ प्रसाराविषयीची मूलभूत चर्चा केली. वाङ्मय परिस्थितीजन्य असते, असे सांगून मराठीत वाङ्मयनिर्मिती आणि वर्ग यांच्या धुरिणत्वामुळे साहित्य एकरंगी झाल्याचे निरीक्षण नोंदविले. संबंध ३०० मैलांचा समुद्रकिनारा महाराष्ट्राच्या कडेला असून, मच्छिमारीविषयी किंवा दर्यावर्दीपणासंबंधी एकही मराठीत पुस्तक नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली होती.



या संमेलनात कविसंमेलनाचे अध्यक्ष होते भा. रा. तांबे. काव्यगायन रात्री १० पासून पहाटे तीनपर्यंत चालू राहिले. कोल्हापूरकरांच्या प्रेम ओहोटीने ग्वाल्हेरहून इथपर्यंत वाहत आल्याचा उल्लेख तांबे यांनी केला होता. या संमेलनात प्रतिनिधी म्हणून संमेलनासाठी ४ रु. शुल्क होते. ज्याना ऊन (गरम) पाण्याची आवश्यकता असेल त्यांनी आठपूर्वी उरकून घ्यावे, असे एका निवेदनात म्हटले होते. या संमेलनास त्याकाळी एकूण खर्च १०,४५९ रुपये आलेला होता. या संमेलनास बडोद्याहून गो. सा. सरदेसाई, चिं. वि. जोशी, प्रकाशक दा. स. यंदे उपस्थित होते. या संमेलनात अनेक महत्त्वाचे ठराव झाले होते. मराठी भाषेचे विद्यापीठ व्हावे यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली होती. त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा समावेश होता. वि. स. खांडेकर बडोद्याच्या दोन संमेलनास उपस्थित होते.

त्यानंतर १९९२ साली कोल्हापुरातील साहित्य संमेलन फार गाजले. साहित्य संमेलन वैभवी आणि थाटात सुरु करण्याची परंपरा तिथपासून सुरु झाली. डी. वाय. पाटील हे संमेलनाचे संयोजक होते. बाळासाहेब जाधव, चंद्रकुमार नलगे यांचा त्यात सहभाग होता. बावड्याच्या मैदानावर ते भरविले होते. संमेलनात लोकांचा सहभाग मोठ्या प्रमाणात होता. महाराष्ट्रातील सर्व साहित्यिकांना निमंत्रित करुन त्यांना आग्रहपूर्वक सपत्नीक निमंत्रित केले होते. परिसरातील लोक बैलगाड्यांतून संमेलनास आले होते. या संमेलनाचे अध्यक्ष होते रमेश मंत्री. इंदिरा संतांचा त्या निवडणुकीत पराभव झाला. त्यावेळी कौतिकराव ठाले-पाटील यांनी लिहिलेल्या लेखांचे शीर्षक होते, 'मंत्री जिंकले, संत हरले'. या संमेलनात प्रतिनिधी शुल्क घेतले नव्हते. महापालिकेने मोफत बससेवा ठेवली होती. वृद्ध साहित्यिकांना त्यांच्या गावाहून आणण्याची सोय केली होती. या वर्षीच्या संमेलनाच्या निमित्ताने कोल्हापूर संमेलनाचे झालेले हे स्मरण.

(लेखक शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागाचे प्राध्यापक आहेत)
kollokmatpratisad@gmail.com